सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०८/०८/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीओएस- ११२२/प्र.क्र.१२१/पोल-३, दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४.

**विषय :-** कोकण रेल्वेमार्गावर रत्नागिरी येथे नवीन लोहमार्ग पोलीस ठाणे निर्माण करण्यास, त्याकरिता पदनिर्मिती व त्यानंषंगाने येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पीओएस- ११२२/प्र.क्र.१२१/पोल-३, दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०८०७१५२५१४२३२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २६-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**कोकण रेल्वेमार्गावर रत्नागिरी येथे नवीन लोहमार्ग पोलीस ठाणे निर्माण करण्यास, त्याकरिता पदनिर्मिती व त्यानुषंगाने येणा-या आवर्ती व अनावर्ती खर्चास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पीओएस-११२२/प्र.क्र.१२१/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : ०७ ऑगस्ट, २०२४.

संदर्भ :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/कोकण रेल्वे/ लोह.मुंबई/१५२/२०२१, दिनांक १७/१०/२०२२, दि.०६.१०.२०२३ व दि.२२.११.२०२३.

२) उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक ०८.०७.२०२४ रोजी चक्रीय पद्धतीने दिलेली मान्यता.

प्रस्तावना :-

अपर पोलीस महासंचालक (नि. व. स), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ रोजींच्या पत्राद्वारे कोकण रेल्वेच्या हद्दीत सक्षम पोलीस यंत्रणा कार्यरत करण्यासाठी हार्बर लोहमार्ग परिमंडळ, कोकण लोहमार्ग विभाग व रोहा, रत्नागिरी व कणकवली या नवीन लोहमार्ग पोलीस ठाणे निर्मितीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे.

२. उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने कोकण रेल्वे मार्गावरील प्रवासी सुरक्षा, विभागाची मागणी, कोकण रेल्वे मार्गावरील भौगोलिक स्थान विचारात घेऊन, सध्या विभागाने प्रस्तावित केलेल्या पोलीस ठाणेंपैकी रत्नागिरी येथे प्रथमत: पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता दिली.

३. त्यानुसार कोकण लोहमार्गावर रत्नागिरी येथे नवीन लोहमार्ग पोलीस ठाणे निर्मिती करण्यास संदर्भ क्र.२ येथील मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने चक्रीय पद्धतीने मान्यता दिली असून, उक्त मान्यता विचारात घेऊन, शासनाने याप्रकरणी पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई यांच्या आस्थापनेवर रत्नागिरी येथे नवीन लोहमार्ग पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उक्त लोहमार्ग पोलीस ठाण्याकरिता या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ"** मध्ये नमूद केलेली विविध संवर्गातील एकूण १५२ नियमित पदे निर्माण करण्यास व त्याकरिता येणा-या रु. १८,९१,६०,५७२/-(रुपये अठरा कोटी एक्याण्णव लाख साठ हजार पाचशे बाहत्तर फक्त) इतक्या आवर्ती खर्चास व रु.९१,७०,०००/- (रुपये एक्याण्णव लाख सत्तर हजार फक्त) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. उक्त पोलीस ठाण्याकरिता येणारा आवर्ती व अनावर्ती खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. रत्नागिरी लोहमार्ग पोलीस ठाणेकरिता हद्दनिश्चितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनास सादर करावा.

५. उक्त शासन निर्णय हा संदर्भीय क्र.२ येथील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०८०७१५२५१४२३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.08.07 15:40:23 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.

जिल्हा कोषागार अधिकारी,रत्नागिरी.

उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.

वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.

निवड नस्ती, पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : पीओएस-११२२/प्र.क्र.१२१/पोल-३
दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४ चे सहपत्र.

**"परिशिष्ट-अ"**

रत्नागिरी लोहमार्ग पोलीस ठाण्याकरिता नव्याने निर्माण
करण्यात येणा-या पदांचा तपशील

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षक | S-१८-(रू.४९००० ते रू.१५५८००) | ०२ |
| २. | सहायक पोलीस निरीक्षक | S-१५-(रू.४१८०० ते रू.१३२३००) | ०३ |
| ३. | पोलीस उप निरीक्षक | S-१४-(रू.३८६०० ते रू.१२२८००) | ०५ |
| ४. | सहायक पोलीस उप निरीक्षक | S-१०-(रू.२९२०० ते रू.९२३००) | ०६ |
| ५. | पोलीस हवालदार | S-९-(रू.२६४०० ते रू.८३६००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ५० |
| ६. | पोलीस शिपाई | S-७-(रू.२१७०० ते रू.६९१००)+ विशेष वेतन रु.७५०/- | ८६ |
| **एकूण पदे -** | | | **१५२** |

*****